संक्षिप्त

मधुमेह दिनानिमित्त उद्या उपक्रम

नाशिक : बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण वाढत असून त्याचा परिणाम हृदयविकार, मूत्रपिंड विकारसारखे आजार वाढण्यात होत आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक मधुमेह दिनाचे औचित्य साधून देवगांवकर हॉस्पिटलच्या वतीने १४ नोव्हेंबर रोजी सकाळी सात वाजता हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर फेरफटक्यासाठी येणाऱ्यांकरिता विनामूल्य आरोग्य तपासणी आणि हृदयविकाराचा झटका आल्यानंतर करावयाच्या उपाययोजना, याबद्दल सीपीआर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. याबाबतची माहिती डॉ. नारायण देवगांवकर, डॉ. पार्थ देवगांवकर यांनी दिली.

दत्तात्रय जोंधळे यांचे निधन

नाशिक : कसबे सुकेणे ग्रामपंचायतीचे माजी सदस्य आणि शेतकरी संघटनेचे नेते दत्तात्रय मुरलीधर जोंधळे यांचे ६९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, मुलगी सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

न्यूमोनिया प्रतिबंधासाठी विशेष मोहीम

आरोग्य विभागाच्या सहकार्याने प्रारंभ

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : सार्वजनिक आरोग्य विभागाने राष्ट्रीय माता व बालसंगोपन कार्यक्रमांतर्गत १२ नोव्हेंबरपासून 'सांस' म्हणजे न्यूमोनिया प्रतिबंध आणि जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. आरोग्य विभागाच्या सहकार्याने मंगळवारी या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालयात सांस मोहिमेचे उद्घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. न्यूमोनिया प्रतिबंध आणि जनजागृती मोहिमेचा लाभ माता व पालकांनी आपल्या बालकांसाठी अवश्य घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शिंदे यांनी यावेळी केले. दरवर्षी १२ नोव्हेंबर रोजी 'युनिसेफ'तर्फे जागतिक न्यूमोनिया दिवस साजरा केला जातो, त्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे न्यूमोनिया सर्वेक्षण आणि प्रतिबंध मोहीम (सांस) प्रत्येक सरकारी उपकेंद्रापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत राबवली जाणार आहे. शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांची रोगप्रतिकारक शक्ती आधीच कमी असते. त्यामुळे थंडीच्या वातावरणात, संसर्गामुळे मुले थेट गंभीर न्यूमोनियासारख्या आजाराला बळी पडतात, आदिवासी दुर्गम भागात नवजात शिशुंना याचा अधिक त्रास होतो. न्यूमोनियासारख्या गंभीर आजारांना टाळण्यासाठी आशा सेविकांमार्फत घरोघरी भेटी देऊन आरोग्य विभाग सर्वेक्षण करणार आहे. माता व पालकांनी सांस या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांनी केले आहे.

यावेळी सांस मोहिमेबाबत सादरीकरणाद्वारे माहिती देणे, ग्रामीण भागामध्ये कशी काळजी घ्यावी, उपचार याबाबत आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविकांनी समाजात कशी जनजागृती करावी, याविषयी अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले. न्यूमोनिया ओळखणे, उपचार करणे आणि योग्य ठिकाणी संदर्भित करणेबाबत जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल नेहेते यांनी माहिती दिली.

आदिवासी दुर्गम भागात प्रमाण अधिक

शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांची रोगप्रतिकारक शक्ती आधीच कमी असते. त्यामुळे थंडीच्या वातावरणात, संसर्गामुळे मुले थेट गंभीर न्यूमोनियासारख्या आजाराला बळी पडतात. आदिवासी दुर्गम भागात नवजात शिशुंना याचा अधिक त्रास होतो. हे लक्षात ठेवत अशा दुर्गम भागात न्यूमोनियासंदर्भात अधिक जागरुकता बाळगणे गरजेचे असते. अधिकाऱ्यांकडून याविषयी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आदिवासी दुर्गम भागात आरोग्यविषयक सुविधा कमी राहत असल्याने त्याचा त्रास नागरिकांना होत असतो.

समीर भुजबळ यांची सभा उधळण्याचा प्रयत्न

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : नांदगाव विधानसभा मतदारसंघात समाविष्ट मालेगाव तालुक्यातील साकूर येथे अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांची सभा उधळण्याचा प्रयत्न झाला. ग्रामस्थांनी आवर घातल्याने गावगुंडांना माघार घ्यावी लागली.

नांदगाव विधानसभा मतदारसंघाची निवडणूक अनेक कारणांनी गाजत आहे. शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) उमेदवार आमदार सुहास कांदे आणि अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांच्यात आरोप-प्रत्यारोपांचे सत्र सुरू आहे. भुजबळ समर्थकांना कांदे यांनी दमदाटी केल्याच्या घटना यापूर्वी घडल्या होत्या. त्या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले. परंतु, प्रचार जसा पुढे सरकत आहे. तसे उभय गटातील वाद उफाळून येत असल्याचे चित्र आहे. सभा उधळण्याचा प्रकार हे त्याचेच उदाहरण. नांदगाव विधानसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या साकूर येथे अपक्ष उमेदवार भुजबळ हे सोमवारी सायंकाळी पोहोचले. मंडपाच्या आवारात सभा सुरू असताना गावातील काही जणांनी तेथे येऊन सभा उधळण्याचा प्रयत्न केला. परंतु, उपस्थित गावकऱ्यांनी सभा पूर्ण करण्याचा आग्रह धरला. गावकऱ्यांच्या एकजुटीमुळे समाजकंटकांना माघार घ्यावी लागली. यावेळी भुजबळ यांनी विद्यमान आमदार हे विकासाच्या मुद्द्यावर बोलत नसल्याची टीका केली.

'इंद्रधनुष्य' महोत्सवात मुक्त विद्यापीठाचे यश

नाशिक : शहरातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने 'इंद्रधनुष्य - २०२४' या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत संगीत विभागात तालवाद्य प्रकारात तृतीय क्रमांक मिळविला.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ येथे हा युवा महोत्सव झाला. त्यात विद्यापीठाचा विद्यार्थी सौरभ बापू कांगणे याने तालवाद्य प्रकारात यश मिळविले. त्यास डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, अभिनेत्री गिरीजा प्रभू यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी डॉ. दयाराम पवार, रवींद्र झालसे आणि मनोहर पाटील आदी उपस्थित होते.

वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : शहर परिसरात वेगवेगळ्या भागात झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. एक अपघात पेठ रस्त्यावरील आशेवाडी बारी येथे झाला. या बाबत सुरेश वाघ (चापडगाव, दिंडोरी) यांनी तक्रार दिली तर दुसरा अपघात विहितगाव भागात झाला.

वाघ हे मित्र संजय चावरे (४० रा.चापडगाव, दिंडोरी) यांच्यासमेवत पेठरोडवरील आशेवाडी बारी येथील म्हसोबा मंदिरात देवदर्शनासाठी गेले होते. दर्शन घेऊन दोघे मित्र रस्ता ओलांडत असतांना पेठरोडकडे भरधाव जाणाऱ्या ट्रॅक्टरने चावरे यास जोरदार धडक दिली. या अपघातात चावरे याच्या अंगावरून ट्रॉलीचे चाक गेल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पसार झालेल्या ट्रॅक्टर चालकाविरोधात म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरा अपघात विहितगाव भागात झाला होता. शंकर हगवणे (५८,सौभाग्यनगर, विहीतगाव) हे २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी दुचाकीने नाशिकरोडकडून विहितगावच्या दिशेने जात असताना लॅमरोडवरील युनियन बँकेसमोर भरधाव मालमोटारीने दुचाकीला धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले होते. खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना सोमवारी त्यांचा मृत्यू झाला. याबाबत नाशिकरोड पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

महिलेवर अत्याचार

प्रेमाच्या जाळ्यात ओढून संशयिताने रायगड येथील महिलेवर शहरात वारंवार अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. संशयिताने अश्लिल छायाचित्र समाजमाध्यमात प्रसारित करण्याची धमकी दिल्याने पीडितेने पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी रायगड पोलिसांनी हा गुन्हा शहर पोलिसांकडे वर्ग केला आहे. संतोष भालेराव (४०, मूळ रा.औरंगाबाद) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. रायगडस्थित पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार संशयित तिचा नातेवाईक असून, तो नाशिक शहरात वास्तव्यास आहे. दोघांमध्ये प्रेमसंबध जुळले. सहा वर्षांत संशयिताने अनेक वेळा महिलेशी संपर्क साधत तिला शहरात बोलावून अत्याचार केला. महात्मानगर भागातील हॉटेलमध्ये संशयिताने अत्याचार करुन महिलेचे अश्लिल छायाचित्र काढले. यानंतर धमकी देत अनेकवेळा अत्याचार केला. यास कंटाळलेल्या महिलेने शहरात येण्यास नकार दिल्याने त्याने अश्लिल चित्रफित व छायाचित्र प्रसारित करण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

दोन शस्त्रधारी ताब्यात

नाशिकरोड भागात शस्त्र बाळगणाऱ्या दोघांना पोलिसांनी वेगवेगळ्या भागातून ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून चार तलवारींसह एक कोयता हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी गणेश हिरणवाळे (१९, भगवा चौक, संगमेश्वरनगर चेहडी पंपीग) आणि अनिकेत गिते (१८, महात्मा फुलेनगर, शिखरेवाडी) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. चेहडी शिव परिसरातील कॅनॉल रस्त्यावर पेरूच्या बागेजवळ असलेल्या युवकाकडे शस्त्र असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पथकाने धाव घेत संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्याकडील चार तलवारी हस्तगत करण्यात आल्या. याबाबत अंमलदार अजय देशमुख यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरी कारवाई शिखरेवाडी भागात करण्यात आली. अटल वाचनालय परिसरात संशयिताकडे कोयता मिळून आला. याबाबत हवालदार विनोद लखन यांनी दिलेल्या तक्रारीवरून उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रब्बी हंगामात पाण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यक्षेत्रातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, नाशिक, दिंडोरी, सिन्नर आणि चांदवड तालुक्यांतील लघु तलावांमध्ये उपयुक्त पाणीसाठा उपलब्धतेनुसार जलाशय, नदी, नाले व कालवे या ठिकाणांवरून प्रवाही, उपसा व ठिंबक पद्धतीने रब्बी हंगाम २०२४-२५ अंतर्गत भुसार, फळबाग व बारमाही उभ्या पिकांसाठी मर्यादित क्षेत्रास पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. या ठिकाणावरून प्रवाही व उपसा सिंचनाचे पाणी घेऊ इच्छिणाऱ्या शेतकरी आणि पाणी वापर संस्थांनी २२ नोव्हेंबरपर्यंत आपले अर्ज नजीकच्या सिंचन शाखा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन नाशिक पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनल शहाणे यांनी केले आहे.

शेतीसाठी उपलब्ध होणाऱ्या पाण्यात पाणीपुरवठा करताना आर्वतन कालावधीत कमी जास्त अंतर करून पुरवावे लागते, यामुळे शेतकऱ्यांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व सूक्ष्म सिंचनावर अधिक भर द्यावा. पिकांना काही कारणास्तव कमी-अधिक पाणी मिळून नुकसान झाल्यास याबाबत कोणतीही नुकसान भरपाई शासनाकडून व पाटबंधारे विभागाकडून देण्यात येणार नाही. याची सर्व लाभार्थ्यांनी नोंद घेवूनच अर्ज दाखल करावेत, असेही सूचित करण्यात आले आहे. ज्या प्रकल्पावर व कालव्यावर नमुना क्रमांक सात नुसार मागणी पाणी उपलब्धतेपेक्षा जास्त असल्यास त्या ठिकाणी मागणी क्षेत्रात समप्रमाणात कपात करून मंजुरी देण्यात येईल. पाणी वापर संस्थांच्या लाभ क्षेत्रातील कोणत्याही वैयक्तिक लाभ धारकाला नमुना सातवर पाणी पुरवठा केला जाणार नाही. पाणी वापर संस्थेतील लाभधारकांनी संस्थेकडेच पाणी मागणी नोंदविणे आवश्यक आहे. पाणी वापर संस्थेस तिच्या लागावडीलायक क्षेत्राच्या प्रमाणात पाणी कोटा मंजूर करण्यात येणार आहे.

शासकीय ग्रंथालयात दिवाळी अंकांचे प्रदर्शन

नाशिक : येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या विविध विषयांवरील दिवाळी अंकांचे प्रदर्शन आयोजि प्रतीमले आहे. हे प्रदर्शन २५ नोव्हेंबरपर्यंत सर्वांसाठी खुले असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी अविनाश येवले यांनी दिली.

सहायक आयुक्त प्रदीप जगताप यांच्या हस्ते या दिवाळी अंकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच उपस्थितांना ग्रंथ भेट देण्यात आला. जगताप यांनी प्रदर्शनातील सर्व दिवाळी अंकांची पाहणी केली. ग्रंथालयाने वाचकांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या या प्रदर्शनाचा वाचन प्रेमींनी आस्वाद घ्यावा, असे आवाहन केले. प्रदर्शन मंगळवारपासून २५ नोव्हेंबरपर्यंत सर्वांसाठी कार्यालयीन वेळेत खुले असणार आहे.

वाहतूक कोंडी... : मुंबई नाका चौकात सुरू आलेल्या कॉंक्रिटीकरणाच्या कामामुळे दररोज वाहतूक कोंडी होत आहे. (छायाचित्रः यतीश भानू)

ADITYA BIRLA CAPITAL — PROTECTING INVESTING FINANCING ADVISING

आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : इंडियन रेयॉन कंपाऊंड, वेरावल, गुजरात – ३६२२६६

कॉर्पोरेट कार्यालय : आर–टेक पार्क, १० वा मजला, निरलॉन कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्सप्रेसवे लगत, गोरेगाव (पू), मुंबई–४०००६३.

"परिशिष्ट – IV–ए"
[सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२च्या रुल ८ (६) व रुल ९(१) च्या तरतुदी पाहा]
स्थावर मालमत्तेच्या विक्रिकरिता विक्रि सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८ (६) व रुल ९(१) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रिकरिता ई–लिलाव विक्रि सूचना. याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको, सह–ऋणको व गहाणकारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा "आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड" च्या प्राधिकृत अधिकारींनी घेतला आहे आणि सदर गहाणवट मालमत्तेची विक्रि ऋणको / सह–ऋणको व गहाणकार म्हणजेच **समृद्धी मिल्क अँड वॉटर एजन्सी (ऋणको), मंगेश शरद भोसले (सह–ऋणको), चारूलता मंगेश भोसले (सह–ऋणको)** यांच्याकडील सुरक्षित धनकोंच्या देय वसूलीच्या तारखेपर्यंत रकमेवरील पुढील व्याज व अन्य खर्च आणि १९.०६.२०२३ रोजीप्रमाणे देय व देणी **रु. १,५६,४०,९९२.९७ (रुपये एक कोटी छप्पन्न लाख चाळीस हजार नऊशे ब्याण्णव व पैसे सत्याण्णव फक्त) या रकमेच्या वसूलीकरिता** २०.१२.२०२४ रोजी **"जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे"** या तत्वावर ई–लिलावाद्वारा करण्यात येणार आहे.

इरठे तपशीलासमवेत स्थावर मालमत्तेची राखीव किंमत याखाली नमूद केलेली आहे :

स्थावर मालमत्तेचे वर्णन	इसारा रक्कम ठेव रक्कम (रु.'त)	राखीव किंमत (रु.'त)
१. बंगलो, तळमजला + पहिला मजला, प्लॉट नं. ०८, सर्व्हे नं. २३८/४/८, गजानन महाराज टेंपलजवळ, वृंदावन, नगर म्हसरूल शिवार, जि. नाशिक–४२२००४.	९,४९,८४५	९४,९८,४५०
२. कमर्शियल शॉप नं. ०३, सर्व्हे नं. १६१/२/१/१/१, प्लॉट नं. ०१, सीडीओ मेरी स्कूलजवळ, तळमजला, जय गुरुदेव को–ऑप. हाऊसिंग सोसा. लि., तारवाला नगर, दिंडोरी रोड, नाशिक–४२२१०४.	१,७६,२५०	१७,६२,५००
३. प्लॉट नं. ०५, सर्व्हे नं. ५८२+५८५, आप्पा धाब्याच्या मागे, शिंदे शिवार, नाशिक–पुणे हायवेलगत, मौजे शिंदे, नाशिक–४२२१०२.	५,३२,२७८.३०	५३,२२,७८३
एकूण	१६,५८,३७३.३	१,६५,८३,७३३

विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर म्हणजेच https://mortgagefinance.adityabirlacapital.com/Pages/Individual/Properties-for-Auction-under-SARFAESI-Act.aspx किंवा https://sarfaesi.auctiontiger.net यावर तरतूद केलेली लिंक पाहावी.

दिनांक : १३.११.२०२४
स्थळ : नाशिक

प्राधिकृत अधिकारी
(आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड)

अर्ज क्र. ३ [पाहा नियमावली-१५(१)(ए)]/१६(३)

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण (डीआरटी ३)

१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्स्चेंज बिल्डिंग, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

प्रकरण क्र. : ओए/२४१/२०२४ **एक्झि क्र. १०१६१**

कर्ज वसुली न्यायाधिकरण (प्रक्रिया) नियमावली, १९९३च्या नियम ५च्या उप नियम (२ए)सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १९च्या उपकलम (४) अंतर्गत समन्स

फेडरल बँक लिमिटेड
विरुद्ध
प्रथोमा स्विचगीअर्स प्रायव्हेट लिमिटेड

प्रति,
(१) प्रथोमा स्विचगीअर्स प्रायव्हेट लिमिटेड
सी-२८, एमआयडीसी, अंबड, नाशिक-४२२ २१०, नाशिक, महाराष्ट्र.

समन्स

ज्याअर्थी, मान. पीठासीन अधिकारी/ निबंधक यांच्यासमोर ओए/२४१/२०२४ सुनावणीसाठी **०५.०४.२०२४** रोजी सूचिबद्ध होती.

ज्याअर्थी, सदर माननीय न्यायाधिकरणाने तुमच्याविरुद्ध **रु. १,६४,६५,४८१.७९/-**च्या कर्जाच्या वसुलीसाठी दाखल करण्यात आलेल्या (ओए)वर नमूद अर्जावर कायद्याच्या कलम १९(४) अंतर्गत नमूद अर्जावर समन्स/ सूचना जारी केली आहे. (कागदपत्रांच्या प्रतींसह अर्ज जोडलेला आहे.)

कायद्याच्या कलम १९च्या पोट कलम (४) अंतर्गत तुम्ही, प्रतिवादी यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :

(i) समन्सची अंमलबजावणी झाल्यापासून तीस दिवसांच्या आत विनंती करण्यात आलेला दिलासा का दिला जाऊ नये यासाठी कारणे द्यावीत;
(ii) मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत अर्जदाराने निर्दिष्ट केलेल्या मालमत्ता आणि मालमत्तेव्यतिरिक्त इतर मालमत्ता किंवा मालमत्तेचे तपशील उघड करणे;
(iii) तुम्हाला मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्ता किंवा अशा इतर मालमत्ता आणि मालमत्तांचे व्यवहार किंवा विल्हेवाट लावण्यापासून, प्रलंबित सुनावणी आणि मालमत्ता संलग्न करण्याच्या अर्जाची निपटारा करण्यापासून प्रतिबंधित केले आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाच्या पूर्वपरवानगीशिवाय मूळ अर्जाच्या अनुक्रमांक ३ए अंतर्गत निर्दिष्ट किंवा उघड केलेल्या इतर मालमत्ता आणि मालमत्तांची सुरक्षा व्याज निर्माण केले आहे त्यांची विक्री, भाडेपट्ट्याने किंवा अन्यथा त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य मार्गाशिवाय कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करता येणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या सामान्य वाटचालीत सुरक्षित मालमत्ता किंवा इतर मालमत्ता आणि मालमत्तेच्या विक्रीद्वारे प्राप्त झालेल्या विक्री उत्पन्नासाठी तुम्ही जबाबदार असाल आणि अशा मालमत्तेवर हमी स्वारस्य असलेल्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यात विक्रीची रक्कम जमा करावी.

तुम्हाला अर्जदाराला दिलेल्या प्रतीसह लेखी निवेदन दाखल करण्याचे आणि **१०.०१.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता** सदर निबंधकांसमोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले असून, असे न झाल्यास तुमच्या अनुपस्थितीत अर्जावर सुनावणी घेतली जाईल आणि त्यावर निर्णय घेतला जाईल.

माझ्या हस्ते आणि सदर न्यायाधिकरणाच्या मुद्रेसह १०.०९.२०२४ रोजी दिनांकित.

टीप : जे लागू नाही ते खोडून टाकावे.

समन्स जारी करण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याची सही
शिक्का
सही/-
(संजाई जैस्वाल)
निबंधक, डीआरटी-III, मुंबई

महानिर्मिती

महानिर्मिती ई-निविदा प्रकाशनाची सूचना

(०१) निविदा. क्रं ३०००५२७६० बीएम-१ (आर) विषय : प्रॉक्यूरमेंट ऑफ ३६" ग्रावीमेट्रिक कोल फिडर बेल्ट वॅट बीएम-१, २५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१२.५१ लाख, **बयाना :** रु.१६०१०/-. **(०२) निविदा. क्रं ३०००५२७२५ बीएम-२ विषय :** वर्क ऑफ इन-सीटू रिपेयर ऑफ बाउल हब लिब्रिंथ, सिटिंग पोर्शन ऑफ कोल मिल एक्सआरपी-९०३ ॲट १×२५० मे.वॅट, ॲट बीएम-२,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१९.७५ लाख, **बयाना :** रु.२३२५१/-. निविदा क्रमांकासाठी ०१ व ०२ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा / निविदा भरण्याचा अंतिम दिनांक : १३.११.२०२४ पासून ११:०० वाजता ते दिनांक : १९.११.२०२४ ते १६:०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक २०.१२.२०२४ पर्यंत १२:०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. **(०३) निविदा. क्रं ३०००५२६८० डब्ल्यूपी-१ (आर) विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ पॉलीइलेक्ट्रोलाईट (नॉन पोर्टेबल) फॉर डब्ल्यूटीपी १,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै. **अंदाजीत खर्च** रु.९.१४ लाख, **बयाना :** रु.१२६४०/-. निविदा क्रमांकासाठी ०३ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा / निविदा भरण्याचा अंतिम दिनांक : १३.११.२०२४ पासून ११:०० वाजता ते दिनांक : २७.११.२०२४ ते १६:०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक २८.११.२०२४ पर्यंत १२:०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. **(०४) निविदा. क्रं ३०००५१३१५ ईएम-२ विषय:** एडब्ल्यूसी फॉर कंप्लीट रिवाईणडिंग ऑफ एलटी मोटर्स ऑफ रेटिंग अबो १.० केडब्ल्यू अप टू ५० केडब्ल्यू इंस्टॉल्ड ॲट ईएम-२,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.३.३६ लाख, **बयाना :** रु.६८६५/-. **(०५) निविदा. क्रं ३०००५२४९४ टीएम-१ विषय :** एएमसी ऑफ रिवर वॉटर सिस्टम ऑफ खडका / नाईकोटा पंप हाऊस, डॅम गेट्स (बरेज गेटस) मेंटेनन्स, पाइप लाइन्स मेंटेनन्स फ्रॉम पंप हाऊस टु रॉ वॉटर टँक ॲट टीएम-१,२५० मे वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२३.०६ लाख, **बयाना :** रु. २६५६३/- **(०६) निविदा. क्रं ३०००५२५५१ ईएम-१ विषय :** एएमसी ऑफ टेलिफोन इंटरकॉम सिस्टम ॲट ईएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.५.४९ लाख, **बयाना :** रु.८९९५/- **(०७) निविदा. क्रं ३०००५२५९२ सिविल-प्लांट विषय :** ॲन्युअल मेंटेनन्स वर्क फॉर रिप्लेसमेंट ऑफ ओल्ड डॅमेज्ड पोर्शन अँड अदर मिसलिनीअस वर्क्स ऑफ सीआय/प्रीमीएर पाइप लाइन वर्क ॲट पॉवर हाऊस प्रीमायसेस, सिविल-प्लांट,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१६.५५ लाख, **बयाना :** रु.२००५०/-. **(०८) निविदा. क्रं ३०००५२५९८ ईएम-२ विषय :** एएमसी फॉर ३३ केव्ही लाइन्स फॉर खडका-नाईकोटा फिडर अँड ११ केव्ही लाइन फॉर कॉलनी फिडर ॲट ईएम-२,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.७.१३ लाख, **बयाना :** रु.१०६३२/-. **(०९) निविदा. क्रं ३०००५२६१३ बीएम-१ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ फरनेस पॅनल पिपहोल डोर्स, फ्युल इंलेट एलबी रिपेअर पॅच, ट्रापेजोडॉल बार फॉर बीएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.३.७१ लाख, **बयाना :** रु.७२१५/-. **(१०) निविदा. क्रं ३०००५२६१४ सीएचपी-यू-६,७ विषय :** सप्लाय ऑफ स्टॅकर रिक्लेमर स्पेअर्स फॉर १४०० एमएम कन्वेयर्स ऑफ सीएचपी यू-६/७,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.८.०८ लाख, **बयाना :** रु.११५८०/-. **(११) निविदा. क्रं ३०००५२६२४ सीएचपी-८ विषय :** रिपेरिंग अँड सर्विसिंग ऑफ इलीकॉन मेक ईएससी १०३० स्कूप कप्लींग फॉर इंपॅक्ट क्रशर इंस्टॉल्ड ॲट सीएचपी-८,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१७.२५ लाख, **बयाना :** रु.२०७५०/-. **(१२) निविदा. क्रं ३०००५२६४५ बीएम-२ विषय :** प्रॉक्यूरमेंट ऑफ मेन ड्राइव गियरबॉक्स फॉर ३६" ग्रावीमेट्रिक कोल फिडर रिक्वायर्ड ॲट बीएम-२,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४७.८० लाख, **बयाना :** रु.५१३००/-. **(१३) निविदा. क्रं ३०००५२६५५ बीएम-१ विषय :** वर्क ऑफ रिकंडिशनिंग, रिपेरिंग अँड रिफर्बिशमेंट ऑफ रिड्यूसर गियर बॉक्स इनपुट शाफ्ट मॅचिंग वीथ इंटरमेडियट गियर व्हील फॉर कोल मिल बीबीडी-४७७२ ॲट बीएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.१९.३१ लाख, **बयाना :** रु.२२८१४/-. **(१४) निविदा. क्रं ३०००५२६५७ सिविल-यू-८ विषय :** वर्क ऑफ रिमूव्हींग ग्रास, श्रब्स अँड ट्रीमिंग ऑफ ट्री ब्रांचेस ईटीसी ॲट सिविल-यू-८, प्रीमायसेस, सिविल प्लांट २५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२२.७० लाख, **बयाना :** रु.२६२०७/-. **(१५) निविदा. क्रं ३०००५२६८१ बीएम-१ विषय :** वर्क ऑफ प्रोवायडिंग अँड फिक्सिंग ऑफ कोल फिडर कन्वेइंग ऑप्टीमायझेशन वर्क ॲट बीएम-१,२५० मे.वॅट, टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.७४.९२ लाख, **बयाना :** रु.७८४२५/-. **(१६) निविदा. क्रं ३०००५२६८६ सिविल-कॉलनी विषय :** एडब्ल्सूसी फॉर प्रोवायडिंग अँड फिक्सिग ऑफ बॉल कॉक (फ्लोट) टू द एक्सिस्टिंग ओवरहेड टॅक्स इन कॉलनी प्रीमायसेस, सिविल-कॉलनी टीपीएस, परळी वै **अंदाजीत खर्च** रु.२.४० लाख, **बयाना :** रु.५९०९/-. सर्व निविदांसाठी : फि रु. ११८०/-. निविदा क्रमांकासाठी ०४ ते १७ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा / निविदा भरण्याचा अंतिम दिनांक: १३.११.२०२४ पासून ११:०० वाजता ते दिनांक : ०३.१२.२०२४ ते १६:०० वाजता निविदा स्वीकृती आणि उघडणे: दिनांक ०४.१२.२०२४ पर्यंत १२:०० पर्यंत आणि १५:०० तासापर्यंत. **संपर्क व्यक्ती:** मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांकः - ८४११९७१५२५.

मुख्य अभियंता

Chola Enter a better life

चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड

कॉर्पोरेट कार्यालय : चोला क्रेस्ट, सी ५४ व ५५, सुपर बी-४, थिरू वि का इंडस्ट्रियल इस्टेट, गिंडी, चेन्नई-६०० ०३२.

शाखा कार्यालय : चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड, ३०२, ३०३ व ३०४, सह्याद्री बिझनेस पार्क इंक., तिसरा मजला, पार्क इंक., त्रिंबक रोड, मायको सर्कल, नाशिक-४२२ ००२; संपर्क क्र. : श्री. दीपक रत्नाकर पगारे, मोबा. क्र. : ८१४९७७२७७७ आणि श्री. मुहम्मद रहिस व्ही., मोबा. क्र. : ८१२४०००००३०.

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ मधील नियम ९(१)च्या तरतुदीसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाणकार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड, यापुढे मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड असा उल्लेख करण्यात येईल,च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे. सदर अनामत मत्तांची विक्री ई-लिलावाद्वारे ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' करण्यात येईल. याद्वारे सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, आम्ही https://auctionfocus.in/chola-lap या वेबसाइटच्या माध्यमातून जाहीर ई-लिलाव राबविणार आहोत.

अ. क्र.	खाते क्र. आणि कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकाराचे नाव	अनु. १३(२) अंतर्गत मागणी सूचनेनुसार दिनांक आणि रक्कम	मालमत्ता/मालमत्तांचे वर्णन	आरक्षित किंमत / बयाणा रक्कम / बोलीवृद्धी रक्कम (रु.)	ई-लिलाव दिनांक आणि वेळ / बयाणा रक्कम जमा करण्याचा शेवटचा दिनांक / पाहणी दिनांक	सूचना कालावधी/ ताब्याचा प्रकार
१	**कर्ज खाते क्र. : एक्स०एचईएनएसपी००००११३८७०९ आणि एक्स०एचईएनएसपी००००१७७१७७१ १. विनय वसंत मोडक (अर्जदार), २. प्रफुल्लता विनय मोडक (सह-अर्जदार), ३. मे. निमिष ऑटो कॉर्पोरेशन (सह-अर्जदार), ४. शुभांगी वसंत मोडक (सह-अर्जदार)** १ ते ४ यांचा पत्ता : प्लॉट क्र. ११, अभ्युदय सोसायटी एसटी कॉलनी, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३.	२३.११.२०१८ २३.११.२०१८ रोजी रु. १,२१,८७,३२३.४२/-	प्लॉट क्र. ११, क्षेत्रफळ सुमारे २०९.११ चौ.मी. त्यावरील बांधलेला सुमारे ८१.२९६ चौ.मी. क्षेत्रफळ असलेला बंगला, अभ्युदय को-ऑप. हा. सोसायटी लि., गंगापूर रोड, एस.टी. कॉलनीच्या शेजारी, सर्व्हे क्र. ७०६/१ए/१/१/११, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीत, नाशिक. **सीआयएफसीएल यांना ज्ञात असलेले बोजे/दायित्वे : ज्ञात नाहीत**	रु. १,५०,००,०००/- रु. १५,००,०००/- रु. १,००,०००/-	०५.१२.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ०१.०० वाजेपर्यंत (प्रत्येकी ३ मिनिटांच्या अमर्याद कालविस्तारासह) ०४.१२.२०२४ (सायं. ०५.३० वाजेपर्यंत) १८.११.२०२४ रोजी स. ११.०० ते दु. ०२.०० वाजेपर्यंत	१५ दिवस/ प्रत्यक्ष ताबा

१. सर्व इच्छुक प्रतिभागी/ बोलीदारांना **https://auctionfocus.in/chola-lap** आणि **https://cholamandalam.com/auction-notices** या वेबसाइटला भेट देण्याची विनंती करण्यात येते. **ई-लिलाव तपशील, मदत, प्रक्रिया आणि ऑनलाइन प्रशिक्षणाकरिता प्रस्तावित बोलीदार येथे संपर्क साधू शकतात- श्री. मुहम्मद रहिस- ८१२४०००००३०/ ६३७४८४५६१६, ई-मेल आयडी: CholaAuctionLAP@chola.murugappa.com. केवळ ई-लिलावाच्या प्रशिक्षणासाठी संपर्क साधावा मे. ऑक्शन फोकस: प्राची त्रिवेदी- ९०१६६४१८४८.**

२. नियम आणि अटींच्या अधिक तपशिलासाठी कृपया **https://auctionfocus.in/chola-lap** आणि ई-लिलावात भाग घेण्यासाठी **https://www.cholamandalam.com/news/auction-notices** वर संपर्क करावा.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ मधील नियम ९(१) अंतर्गत ही १५/३० दिवसांची वैधानिक विक्री सूचनादेखील समजण्यात यावी.

दिनांक : १३.११.२०२४, स्थान : नाशिक

स्वा/- प्राधिकृत अधिकारी, चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड